# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि /509 /२०१९

दिनांक: 5 /04 /२०१९

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी
संलग्नित महाविद्यालये
(चंद्रपुर व गडचिरोली जिल्हा.)

विषय :— विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळविण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील कार्यवाही त्वरीत पुर्ण करण्याबाबत

संदर्भ :— क्र. उशिसं/शिष्य—२०१८/डीबीटी/५५९५ दिनांक ०४/०४/२०१९
प्राप्त दिनांक ०५/०४/२०१९

महोदय

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयांकडुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळविण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील कार्यवाही त्वरीत पुर्ण करण्याबाबत विद्यापीठाला पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्रानुसार विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहीती नमुद करुन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अर्जावर पुढील ०३ दिवसात कार्यवाही करणे आवश्यक आहे. इंन्स्टियुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहीती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय,संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच महाविद्यालय/संस्था/विद्यापीठे यांनी कोणत्याही परीस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत असे सदर पत्रात नमुद केलेले आहे. सदर पत्र सोबत संलग्नित करण्यात येत आहे. महाविद्यालयाने संलग्नित केलेल्या पत्रानुसार कार्यवाही घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

(डॉ. व्ही.सी. सिलारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलग्नित :— उपरोक्तप्रमाणे

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ..........
जावक क्र. 3838 दि. 5/4/19

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 5595 दि. ०४/०४/२०१९

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 1681 दिनांक 5/4/19
...... दिनांक ......

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवरील कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत....**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन मान्यता देणे आवश्यक आहे. याबाबत वारंवार सूचना देऊनही अद्यापही अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज कार्यवाहीसाठी शैक्षणिक संस्था स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर पुढील ०३ दिवसांत कार्यवाही करणे आवश्यक आहे. इन्स्टियुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. याची नोंद घ्यावी. महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.**

प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नसून, मुदतीनंतर प्रलंबित राहिलेल्या अर्जाबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील. सदरची बाब आपल्या विभागातील सर्व अकृषि विद्यापीठे तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.